# प्रशासन शेतक-यांच्या पाठीशी

दि. ७: किटकनाशकाच्या फवारणीमुळे बाधा झालेल्या शेतक-यांवर तातडीने रूग्णालयात उपचार सुरू असून मृत्यु झालेल्या शेतक-यांच्या पाठीशी शासन उभे आहे. प्रशासन शेतक-यांप्रती संवेदनशिल असून बाधीत शेतक-यांवर तातडिने उपचार करण्यासाठी आरोग्य यंत्रणेला सज्ज राहण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी दिले आहे.

किटकनाशकाच्या फवारणीमुळे बाधीत होऊन आतापर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ११५ शेतकरी दाखल झाले होते. त्यांना तातडीने उपचार करून करून सुटी देण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सक विभागाकडे २१८ शेतक-यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. रुग्नांवर उपचार करून सुटी देण्यात आली. तसेच वसंतराव नाईक जिल्हा शासकिय रुग्णालयात ४३१ शेतकरी व शेतमजूर यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांचेवर उपचार करून सुटी देण्यात आली. तर आज रोजी २८ बाधीत शेतकरी यांच्यावर रुग्णालयात वैद्यकिय उपचार सुरू आहे.

जिल्ह्यात किटकनाशकाच्या फवारणीमुळे विषबाधा होऊन १९ शेतक-यांचा मृत्यु झाला आहे. तसेच जिल्ह्यातील कुठल्या भागात शेतक-यांना फवारणीमुळे बाधा झाली आहे वा होत यासाठी महसूल, कृषी विभाग, आरोग्य यंत्रना तपासणी करून त्यानां तातडीने उपचार करण्यात येत आहे. तसेच महसूल यंत्रना आणि कृषी विभाग यांच्या संयुक्तपणे विनापरवाना किटकनाशकांची कृषी केंद्रांची तपासणी करीत आहे. त्याचप्रमाणे बळीराजा चेतना अभियानांतर्गत जिल्ह्यातील ११९८ ग्रामंपचायंतीना फवारणी संरक्षक किट साठी ११ लाख ६० हजार ५०० रूपये वितरीत करण्यात आले आहे.

किटकनाशकामुळे किती शेतकरी बाधीत झाले, किती शेतक-यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले याचा आढावा दारोज सायंकाळी साडेपाच वाजता जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख आढावा घेणार आहे. या आढावा बैठकिला मुख्य कार्यकारी अधिकारी, वसंतराव नाईक शासकिय रूगणालय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्हा कृषी विकास अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक उपस्थित राहणार आहे.

--------------------